## प्रास्ताविक

**आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु । बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ।। ( १-२-३ )** काठक श्रुतीतील या मंत्रामधे मनाची भूमिका सांगितली आहे. ज्या मनाच्या श्लोकांचा अभ्यास करायचा आहे त्या मनाचे कार्य मध्यवर्ती आहे. वासना, वासनेनुसार बुद्धी, बुद्धीच्या स्वाधीन असलेले मन, प्रत्यक्ष मनाच्या स्वाधीन असलेली इंद्रिये आणि इंद्रियांनी चालविलेला त्यांच्या त्यांच्या विषयांचा पाठलाग अशी ही मानवी देहाच्या निर्वाहाची साखळी आहे. मनाचे स्वरूप सांगताना संत ज्ञानदेव म्हणतात - मन ही व्यर्थ व सर्वांगाने कल्पनाच आहे. ते रजोगुणाच्या खांद्यावर तरळते. ते पंचभूतातील अपंचीकृत वायूचे झाले आहे. रजोगुणाचे चांचल्य, वायूचा प्रवाहीपणा त्याला सहजच लाभलेला आहे. त्यामुळे ते '**बळीयामाजी महाबळी । करी राखरांगोळी धैर्याची**' (संत एकनाथ महाराज) असे होऊन राहते. त्यामुळे त्याला आंजारून गोंजारून अनुकूल करून घेण्याची आज्ञा समर्थ देतात. येथे निरोधाची भाषा नसून विचाराची आहे.

'**जनी निंद्य ते सर्व सोडूनि द्यावे**' ह्या एका सुविचारात संघर्षावाचून जीवनाची बरीच हमी आहे. समाजाची गुंफणच अशी आहे की त्यात खोटे आरोप, अकारण निंदा, स्पर्धा, मत्सर इत्यादिकांचा सामना करावा लागतो. त्यावेळी '**मना त्वांचि रे पूर्व संचीत केलें । तयासारिखें भोगणें प्राप्त झालें**' असा सबुरीचा विचार सांगावा लागतो, अन्यथा मनाची उभारी कमी होऊन सूडासारखे नकारात्मक व परमार्थाला मारक अविचार होऊ शकतात. चालू घडीला अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक चळवळींची धग थोडीफार तरी सामान्य माणसापर्यंत पोहोचते. युद्धे, दंगली, बंद, संप, धरणे, अपघात, चक्काजाम, गुन्हेगारी इत्यादी नियंत्रणाबाहेर जाऊन त्यांचा फटका तिऱ्हाइतालाही बसू शकतो. हे सर्व वाढले असता त्याचे व्यापक परिणाम जीवनावर होतात. ह्या संघर्षजन्य परिस्थितीत न्याय, नीती, सभ्यता, शिस्त इत्यादी वाळल्या पानासारखे उडून जातात. अशा प्रसंगी समर्थ समजावून सांगतात - '**मनीं मानव व्यर्थ चिंता वहातें । अकस्मात होणार होऊनि जातें ।। घडे भोगणे सर्वही कर्मयोगें । मतीमंद तें खेद मानी वियोगें ।।**' **( श्लोक क्र. १७ )**

बाविसाव्या श्लोकात समर्थांनी मनाला एक मार्मिक मागणे मागितले आहे. '**मना सज्जना हीत माझें करावें । रघूनायका दृढ चित्तीं धरावें ।।**' येथे 'माझे' हित मनाने करावयाचे आहे. मी व मन ह्यात केलेला फरक लक्षात घ्यावा लागतो. येथे 'मी' जीवदशा पत्करलेला जीव असून बुद्धी व इंद्रिये ह्यांचेमधे ये जा करणारे मन हे जीवाच्या स्वाधीन असावयास हवे असे साधन आहे. ते जेव्हा जीवावर कुरघोडी करते तेव्हां जीवाला मनाची 'मनधरणी' करावी लागते! सर्व पारमार्थिक वाङ्मयात मनाला अनेक प्रकारे दोष देण्यात आलेला आहे. वस्तुत: ते वासनेने नियंत्रित केलेल्या बुद्धीच्या स्वाधीन आहे. '**बुद्धी कर्मानुसारिणी**' ह्यात वासनेच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या बुद्धीच्या निर्णयानुसार केलेल्या कर्माला अनुसरते. '**संचित तैसी बुद्धी उपजे मनामधी**' हे वचन वासना - बुद्धी- मनाला आज्ञा -इंद्रियांकडून कर्म असा क्रम सांगते. बुद्धी सत्त्वगुण व अग्नितत्त्वाची असून मन हे रजोगुण व वायुतत्त्वाचे आहे. जे जे त्रिगुण व पंचभूतात्मक आहे ते ते अचेतन आहे. अचेतनाला उपदेश वा आज्ञा करता येत नाही. त्यामुळे अंत:करणात व्यापून राहिलेल्या चिदाभासालाच समजावून सांगता येते. ह्या चिदाभासालाच आत्मज्ञान होते

असे शास्त्र सांगते. त्यामुळे 'मनोबोध' हा वास्तविक समर्थांनी जीवाला केलेला बोध आहे. पुढे **'जीवा संशयो वाऊगा तो त्यजावा' ( श्लोक क्र. ७५ )** येथे स्पष्टपणे जीवालाच बोध केला आहे.

मनोबोधाच्या श्लोकांची मांडणी विविध प्रकारे केली आहे. काही श्लोक 'हे करावे' अशा अर्थाचे आहेत. काही प्रतिबंधकारक असून, काही सर्वसामान्य उपदेशाचे आहेत. उदाहरणार्थ, **'धरा श्रीवरा त्या हरा अंतरातें । तरा दुस्तरा त्या परा सागरातें ।।' ( श्लोक क्र. ८० )**. काही श्लोक भक्तिमाहात्म्य सांगणारे आहेत, उदाहरणार्थ– **'विठोनें शिरी वाहिला देवराणा । तया अंतरीं ध्यास रे त्यासि नेणा..।।' ( श्लोक क्र. ८४ )** काही श्लोक आश्वासक स्वरूपाचे आहेत. **'स्वयें नीववी तापसी चंद्रमौळी । तुम्हां सोडवी राम हा अंतकाळी ।।' ( श्लोक क्र. ८५ ). 'मुखीं राम त्या काम बाधूं शकेना । गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ।। हरीभक्त तो शक्त कामास मारी । जगीं धन्य तो मारूती ब्रह्मचारी ।।' ( श्लोक क्र. ८७ )** ह्या श्लोकात श्रेष्ठ रामनामधारकाचा पारमार्थिक पराक्रम सांगितला आहे. साधकाची निर्भत्सना करून श्रीरामाचा त्याला आधार असल्याचा दिलासाही समर्थ देतात, **'भवाच्या भयें काय भीतोस लंडी । रघूनायकासारिखा स्वामी शरीरीं ..।।' ( श्लोक क्र. २७ )** वास्तविक मनोबोधाचा वेदान्तशास्त्र हा प्रत्यक्ष विषय नाही, तरी कोठे कोठे तो प्रकर्षाने जाणवतो.

**करी काम निष्काम या राघवाचें । करी रूप स्वरूप सर्वां जिवांचे ।। करी द्वंद्व निर्द्वंद्व हे गूण गातां । हरीकीर्तनीं वृत्तिविश्वास होतां ।। ( श्लोक क्र. ७७ )** निष्काम कर्म हे पायाभूत साधन आहे. येथे काम या शब्दाचा निष्कामतेच्या संदर्भाने कर्म असाच अर्थ करावा लागतो. पुढील अत्यंत मार्मिक चरणात जीवांची लाखो रूपे न पाहता त्यांचे एकच असलेले स्वरूप पाहावे असा समर्थ उपदेश करतात. शरीर हे रूप असून त्यात आत्मरूप निर्लेपपणे व्यापून असते तिकडे समर्थ लक्ष वेधून घेतात, असे केल्याने सुखदुःखात्मक द्वन्द्वे व त्रिगुणांच्या वाटणीमुळे होणारे स्वभावभेद कमी लक्ष वेधून घेतात व मन स्थिर राहते.

मनोबोध ही एक बहुआयामी रचना आहे. मानवी जीवनाचे अनेक आयाम त्यात दर्शविले आहेत. क्रोध, काम, लोभ, मद, मत्सर, दंभ इत्यादी (श्लोक क्र. ६) हे मानवी जीवनाला मिळालेले शाप आहेत, त्याने जीवन क्षुब्ध होते. शान्त, तृप्त व लयबद्ध जीवनाला ते घातक आहेत.

सुखाचा सतत शोध घेणारा माणूस अशी दुःखाची कारणे का गोळा करतो ? तुलना, ईर्षा, शर्यत, हेवेदावे ह्यांचा कळत न कळत का पाठलाग करतो ? ह्याचे एकमेव कारण म्हणजे परमार्थ शास्त्रात जे 'करू नका' सांगितले आहे तेच करणे ! मानापमान, ताठरपणा ह्यांना हळूहळू सोडून दिले तर जीवन नक्कीच सुसह्य होते. (श्लोक क्र. ७) कीर्तीसाठी काही न करता जे केले त्याची कीर्ती मागे उरावी असेच कर्म करावे (श्लोक क्र. ८). येथे समर्थ कीर्तीचा पाठलाग करण्यास सांगत नाहीत. सत्कर्माची सहजच कीर्ती होते. संत ज्ञानदेव, तुकाराम, समर्थ ह्यांची कीर्ती जनमानसात दृढ आहे. त्यासाठी त्यांचे वर्तमानपत्रात नांव व फोटो झळकावे लागत नाही. नव्या काळातील आइनस्टाइन, भाभा, माणेकशॉ, रमणमहर्षी इत्यादिकांची नावे चटकन डोळ्यासमोर येतात.

भीती हा मानवी जीवनाचा एक प्रमुख घटक आहे. भय, द्वेष, मत्सर, आसक्ती इत्यादिकांत द्वैताचा जोर फार मोठा असतो. भय वाटण्याची कित्येक कारणे आहेत. भयाच्या सूक्ष्म तरंगापासून महाभयानक लाटेपर्यंत कित्येक

आविष्कार आहेत. अन्त, नाश, मरण, रोग, असुरक्षितता, उतरती कळा, पराभव, शत्रूची सरशी, दुबळेपणा, दारिद्र्य, अपघात, अपमान, अपयश, काळजी, तोटा, नैसर्गिक आपत्ती, राजकीय व सामाजिक उद्रेक, गुन्हेगारी, वैर, ईर्षा, गृहकलह इत्यादी भीतीची कित्येक क्षेत्रे आहेत. या सर्वांचा एका 'भवभय' ह्या शब्दात समावेश करून '**भवाच्या भये काय भीतोस लंडी**' असा निर्भत्सनापूर्वक समाचार घेतात ! '**वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ।**' ह्याप्रकारे एका श्लोकातसुद्धा तशी प्रार्थना केली आहे.

अवास्तव अपेक्षा, दुबळे मन, कर्तव्यशून्यता, बावळटपणा, नेभळेपणा, ईश्वरशरणागतीचा अभाव, एकलकोंडेपणा, अपराधभावना इत्यादी भीतीची आणखी कारणे आहेत. मनोबोधामधे या सर्वांवर मात करण्याची शिकवण आहे. त्याच्या अभ्यासाने खणखणीत जीवन जगून ज्ञानोपासनापूर्वक मोक्षाची पूर्वतयारी होण्याची व्यवस्था आहे.

संशय हा साधकाचा फार मोठा वैरी आहे. अंधश्रद्धेपेक्षा संशय वाईट, कारण अश्रद्धा निदान परमार्थ पूर्णपणे नाकारते. संशयामधे श्रद्धेला अनंत फाटे फुटतात, '**ढळे नाढळे संशयोही ढळेना**' (**श्लोक क्र. १४२**). गीताही '**संशयात्मा विनश्यति**' असेच सांगते (४-४०). '**निश्चयाचे बळ तुका म्हणे हेचि फळ**' या सामर्थ्याचा विचार केला असता, संशय हा किती 'अविचार' आहे हे कळते. व्यवहारातील संशयसुद्धा किती अनर्थकारक आहेत ते पाहिले असता परमार्थातील संशय किती मोठी हानी करीत असतील हे लक्षात येते.

मनोबोधामधे वेदान्तशास्त्राचा गंभीर विचार समर्थांनी सांगितला आहे. '**जुनें ठेवणें मी पणें आकळेना**' ह्या धृपदाचे पाच श्लोक आणि '**मना संत आनंत शोधूनि पाहें**' ह्याचे सहा श्लोक ही त्याची काही उदाहरणे आहेत. 'जुने ठेवणे' ह्या शब्दयोजनेचा 'अनादि' व 'नित्यप्राप्त' हा मुख्य अर्थ आहे. आत्मा/ब्रह्म स्वरूपाने अनादि, नित्य असून ते खरे तर प्राप्तव्य नाही, ते सहज प्राप्तच आहे. शुद्ध जाणीव हे त्याचे ज्ञानरूप स्वरूप असून अशुद्ध जाणीव अज्ञानमूलक आहे.

**येऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं । मी अमुका आहे ऐसी । जे बुद्धी स्फुरे अहर्निशी । ते वस्तू गा मी ।। (ज्ञाने. १५-४२१) नवल अहंकाराची गोठी । विशेषें लगे अज्ञानाचिये पाठीं ।।** हा अहंकार अज्ञानमूलक आहे. पहिला अहं 'जुने ठेवणे' असून दुसरा अहं त्याचा अनुभव घेण्याला अडसर ठरतो. ह्या अहंचा निरास हे साधनामार्गातील मोठे आव्हान आहे. 'मी उंच आहे' हा देहसापेक्ष अहंकार आहे. ती उंची गृहीत धरून कपडे शिवणे आवश्यक असले तरी तो अहंकार नसून सामान्य व्यवहार आहे. सुंदर स्त्रीने ते सौंदर्य लक्षात घेऊन स्वत:ला सांभाळणे हा सौंदर्याचा अहंकार नसून लोकव्यवहार आहे. असेच बुद्धिमत्ता, श्रीमंती, देहसामर्थ्य, खेळ, लौकिकातील पद इत्यादी बाबतीत लक्षात घ्यावे लागेल. संन्यासात संन्यस्तपणाचा अहंकार नसेल तर हे सर्व अहंकार सहजच नसतात. म्हणूनच शास्त्रकारांनी 'गुणगंध वैराग्य' ह्या शब्दाची योजना करून वैराग्याचेही वैराग्य सुचविले आहे. सान्त पदार्थांच्या साम्राज्यात रमणाऱ्या माणसांना अनन्त ह्या शब्दाचा एका व्यक्तीचे नांव एवढाच अर्थ ठाऊक असतो ! अंत असलेल्या अगणित पदार्थांना एकमेव अनंताचे अधिष्ठान असते हे कळण्याची व्यवस्थाच क्वचित कोणाला कळते. त्यातील क्वचित कोणी तरी ती व्यवस्था समजावून घेऊन त्याप्रमाणे अनंताचा शोध घेतो व ह्या शोध घेणाऱ्यांपैकी क्वचित कोणाला तो शोध अनुभवरूपाने लागतो. असे हे क्वचित (कश्चित) चे साम्राज्य आहे.

**डॉ. श्री. द. देशमुख**